# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 05/11/2022 (शनिवार) सायंकाळ

---

## मोटरसायकल चोरी

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :— अंतर्गत ०४ किमी अंतरावर वार्ड नं. ०२, टाकळघाट येथे दिनांक ०४/११/२०२२ चे ०८.०० वा. ते दिनांक ०५/११/२०२२ चे ०६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— मंगेश रामकृष्ण बजाईत, वय २९ वर्ष, रा. वार्ड क्र. ०२ टाकळघाट ता. हिंगणा जि. नागपुर हे एम.एस.ई.बी. सिंदी रेल्वे येथे नौकरी करतो. फिर्यादीचा भाऊ नामे— दिनेश रामकृष्ण बजाईत हे दोघेही एकत्र राहत असुन फिर्यादीच्या भावाचे नावाने असलेली होंडा शाईन काळया रंगाची मोटरसायकल क्र. एमएच— ४०/ए.बी.— ३११३ क्रमांकाची रात्रीचे वेळेस नेहमी घरासमोर ठेवली असता व नमुद घटना वेळी मोटरसायकल दिसुन न आल्याने फिर्यादीने आजूबाजूला शोध घेतला असता मोटरसायकल दिसुन आली नाही. कोणीतरी अज्ञात आरोपीने किमती अंदाजे १०,०००/— रुपयाची मोटरसायकल चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

**पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत १८ किमी. अंतरावर मौजा मोहपा क्रिडा संकुल येथे ०४/११/२०२२ चे ०६.०० वा. सुमारास यातील फिर्यादी नामे— श्रीमती कल्पना हिरामण पुरी, वय ४० वर्ष, रा. वार्ड क्र. ०५ मोहपा ही दिवाळी सणानिमीत्त आपले मोठया मुलीला भेटण्याकरीता नागपूर येथे गेली असता यातील मृतक फिर्यादीचा पति नामे— हिरामण राम पुरी, वय ४७ वर्ष, रा. वार्ड क्र.०५ मोहपा तह. कळमेश्वर हे चहाचे हॉटेल चालत नाही यावरून ते नेहमी चिंतीत राहत होते. याच कारणावरून दिनांक ०४/११/२०२२ रोजी सकाळी ०६.०० वा. कोणतेतरी विषारी औषध प्राशन करून मोहपा येथील क्रिडा संकुल येथे मरण पावल्याचे आढळुन आल्याने अशा फिर्यादीच्या तोंडी रिपोर्टवरून सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी फियादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस स्टेशन कळमेश्वर करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर